| | | |
|---|---|---|
| सदरक्षणाय खलनिग्रहणाय | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन<br>पोलीस विभाग | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


पोलीस उप आयुक्त, परिमंडळ –३, मुंबई

वरळी पोलीस ठाणे इमारत, २ रा माळा, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई –४०० ०३०

दुरध्वनी क्र. ०२२–२४९३१७७३ Email Id – dcpzone3.mum@mahapolice.gov.in


# ''प्रेस नोट''

दिनांक : १७/०८/२०२३

ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई गुन्हा नोंद क्र. ३४८/२०२३ कलम ३०२, ३९४, ३९७, ४५२, ५०६, १२०(ब) भादंवि गुन्हया बाबत.

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | ३४८/२३, कलम ४५२,३९४,३९७,३०२,३२३,५०६,१२०(ब),३४ भादंवि |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दि. १३/०८/२३ रोजी सकाळी ०६:०० वा ते ०८:०० वा चे दरम्यान |
| गुन्हा दाखल, दिनांक व वेळ | दि. १३/०८/२०२३ रोजी १९:०५ वा. |
| गुन्हयाचे ठिकाण | रुम क्र ०७, तिसरा माळा, युसुफ मंजिल बिल्डींग, काशीनाथ स्ट्रीट, ताडदेव, मुंबई |
| फिर्यादीचे नांव व पत्ता | श्री.मदनमोहन रतनलाल अग्रवाल, वय – ७५ वर्षे, धंदा– व्यवसाय ,रा.ठी. रुम क्र ०७, तिसरा माळा, युसुफ मंजिल बिल्डींग, काशीनाथ स्ट्रीट, ताडदेव, मुंबई. |
| अटक आरोपींची संख्या व नाव | एकुण तीन–<br>१) पुरूष वय ३७ वर्षे, धंदा – नोकरी, रा.ठि. बॉम्बे टॉकीज जवळ, मालाड (पुर्व), मुंबई.<br>२) पुरूष वय ३१ वर्षे, रा.ठि. मुपो–झालरापाटण, जिल्हा – झालावाड, राज्य –राजस्थान<br>३) पुरूष वय ३५ वर्षे रा.ठी. घर नं. १, किडझी स्कुल जवळ, सुभाषनगर कॉलनी, झालावाड, जिल्हा – झालावाड, राज्य –राजस्थान |
| गुन्हयाची कार्यपध्दती | गुन्हेगारी कट रचुन बळीताच्या घरात घुसणे मारहाण करुन घरातील इसमांना नायलॉन दोरीच्या व चिकटपट्टीच्या साहयाने बांधुन जिवे ठार मारुन घरातील मालमत्ता जबरदस्तीने चोरी करणे |

फिर्यादी नामे श्री. मदनमोहन रतनलाल, अग्रवाल वय ७५ वर्षे रा.ठी. युसुफ मंजील बिल्डींग, काशीनाथ स्ट्रीट, ताडदेव, मुंबई हे दिनांक १३/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. चे सुमारास नेहमीप्रमाणे मॉर्निग वॉकला जाण्यासाठी घराचे मुख्य दरवाजातून बाहेर पडत असताना घराचा बाहेर दबा धरून असलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्याना घरात ढकलून त्यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करुन दरवाजा आतुन बंद करुन फिर्यादी यांचे हात व पाय रस्सीने बांधुन तसेच तोंडास चिकट टेप लावुन तसचे त्यांचे पत्नी नामे श्रीमती सुरेखा मदनमोहन अग्रवाल वय ७० वर्षे यांचे हातपाय रस्सीने बांधून तीच्या नाका तोंडास चिकटटेप लावून तीचा श्वासोच्छवास बंद करुन त्यांचे पत्नीला जीवे ठार मारले. तसेच फिर्यादी यांचे बेडरुमच्या कपाटातील सोन्या–चांदीचे व डायमंडचे दागिने तसेच रोख रक्कम इ. जबरीने चोरुन नेली. सदर गुन्हयाचा तपास ताडदेव पोलीस ठाण्याकडून चालू आहे.

सदर गुन्हयात कोणत्याही प्रकारचा सुगावा नसताना मा. पोलीस सह आयुक्त ( कावसु ) व मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली मध्य प्रादेशिक विभागामधील पोलीस ठाणेचे गुन्हे

प्रकटीकरण पथके व ताडदेव पोलीस ठाणेचे अधिकारी यांची आरोपीतांचा शोध घेणेकामी वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. सदर पथकांनी तपासादरम्यान खब—यांमार्फत गोपनीय माहिती प्राप्त करून तांत्रीक तपासाचा आधार घेत पाहिजे आरोपीतांची नावे निष्पन्न केली. त्याप्रमाणे सदर तपास पथके मुंबई मधील वेगवेगळया ठिकाणांसह पुणे, इंदौर, उज्जैन, राजस्थान इत्यादी ठिकाणी रवाना करण्यात आली होती.

नमूद निष्पन्न झालेल्या आरोपीताचा तांत्रिक पध्दतीने तसेच खबऱ्यांच्या मदतीने शोध घेत असताना दि. १५/०८/२०२३ रोजी ताडदेव गुन्हे प्रकटिकरण पथकास माहिती मिळालेवरून ताडदेव पोलीस ठाणेचे सपोनि जोष्टे, सपोनि बी पाटील, पोउनि आव्हाड व पथक यांनी गुप्तबातमीच्या आधारे खानपुर पोलीस ठाणे, जि. झालावाड, राज्य— राजस्थान या ठिकाणी सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी पुरूष, वय ३५, रा.ठी. घर नं. १, किडझी स्कुल जवळ, सुभाषनगर कॉलनी, झालावाड, जिल्हा — झालावाड, राज्य —राजस्थान येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने जावुन आरोपीचा शोध घेतला असता तो त्या ठिकाणी खालील नमुद हस्तगत मालमत्तासह मिळुन आला. सदर आरोपीतास ताब्यात घेतल्यानंतर त्याचेकडे केलेल्या तपासात आरोपीने सदरचा गुन्हा केल्याची स्वयंस्पष्ट कबुली दिली. सदर गुन्हयामध्ये त्याचेसह सहभागी असलेल्या इतर पाहीजे आरोपीतांबाबत त्याच्याकडे तपास केला असता त्याने त्याचा मित्र पुरूष, वय ३७ वर्षे, रा.ठी मुंबई याचेसह नमुद गुन्हयाचा संगनमताने कट रचला होता असे सांगितले.

तसेच गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने सपोनि जोष्टे व पथक यांना तांत्रिक तपासाच्या व गुप्त बातमीदाराच्या माहीतीच्या आधारे दुसऱ्या पाहीजे आरोपी पुरूष, वय ३१ वर्षे, रा.ठी. जरेल, ता झालरापाटण, जिल्हा — झलवाड, राज्य —राजस्थान याचा राजस्थान मधील झालरापाटण परिसरात तेथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेतले व त्याचेकडे केलेल्या तपासात आरोपीने अन्य सह आरोपीं सोबत मिळुन तसेच गुन्हेगारी कट रचुन नमुद गुन्हा केल्याची स्वयंस्पष्ट कबुली दिली. वर नमुद दोन्ही आरोपीना गुन्हयात दिनांक १६/०८/२०२३ रोजी राजस्थानहुन अटक करण्यात आली आहे.

**<u>हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता:—</u>**
**<u>१८१८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेगवेगळया प्रकारचे दागिने</u>**

याशिवाय नमुद गुन्हयामध्ये आरोपी पुरूष, वय ३७ वर्षे, रा.ठी मुंबई याचा कटकारस्थान ( Criminal Conspiracy ) मध्ये सहभाग निष्पन्न झाल्याने गुन्हयामध्ये भादवि कलम १२०(ब) प्रमाणे वाढ करून आरोपीस दिनांक १६/०८/२०२३ रोजी मुंबईहुन अटक करण्यात आली.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री.देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. अनिल पारस्कर, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई श्री अभिनव देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त श्री. अकबर पठाण, सहायक पोलीस आयुक्त श्रीमती. शोभा पिसे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विवेक शेंडे, पोलीस निरीक्षक अतुल येरमे, पोलीस निरीक्षक दिलीप मसराम, पोलीस निरीक्षक अमोल टमके, सपोनि सिध्देश जोष्टे, सपोनि. भैरवनाथ पाटील, सपोनि सुतार, सपोनि चेमटे, सपोनि सुहास माने, सपोनि किरण पाटील, सपोनि योगेश पाटील, सपोनि नंदनवार, सपोनि मोहिते, पोउनि सचिन पाटील, पोउनि शेळके, पोउनि सचिन आव्हाड, पोउनि गंगावणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार पोना गणेश सांगळे, पो शि मुबारक आत्तार, पो शि सुदर्शन सावंत, पो शि कुष्णा सानप, पोह अविनाश चव्हाण व मध्य प्रादेशिक विभागातील अधिकारी व अंमलदार यांनी दिवस/रात्र अथक प्रयत्न करून तपास कौशल्याचा वापर करून कमी कालावधीमध्ये गुन्हा उघडकीस आणुन नमुद आरोपीतांना अटक करण्यात यश संपादन केले आहे.

*******